# प्रेस नोट

## अनुकंपा भरती बाबत उमेदवारांना आवाहन

शासन निर्णय दिनांक- 31 जुलै 2025 नुसार सन-2025 साठी अनुकंपा धारक उमेदवारांना नियुक्ती देण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार अनुकंपा उमेदवारांची प्रतिक्षायादी जिल्हा परिषद धाराशिव च्या **https://zpdharashiv.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

यामध्ये यादीतील अ.क्र -01 ते 80 मधील नमुद उमेदवारांची अनुकंपा भरती प्रकियेसाठी मुळ कागदपत्रांची पडताळणीसाठीचा कॅम्प दिनांक- 03.09.2025 ते 04.09.2025 या कालावधीत सकाळी 11.00 पासुन स्थायी समिती सभागृह जिल्हा परिषद धाराशिव येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

करीता जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत अनुकंपा प्रतिक्षायादीवरील उमेदवारांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, त्यांनी कागदपत्र पडताळणीसाठी खालील दिनांकास नमुद केल्याप्रमाणे त्यांचे शैक्षणिक व इतर मुळ कागदपत्रासह वेळेवर उपस्थित राहावे, त्याचप्रमाणे मुळ कागदपत्र सादर केली असल्यास सादर केलेली पोहोच व कागदपत्राची सत्यप्रतीसह उपस्थित राहावे.

| दिनांक | अनुकंपा जेष्ठता यादीतील क्रमांक | शेरा |
|---|---|---|
| 03.09.2025 | 1 ते 50 | |
| 04.09.2025 | 51 ते 80 | |

वरीलप्रमाणे नेमून दिलेल्या दिवशी अनुकंपाधारक उमेदवार उपस्थित न राहिल्यास अथवा उपस्थित राहून कागदपत्रांची पुर्तता न केल्यास प्रतिक्षायादी प्रमाणे सदर उमेदवाराचा अनुकंपा नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. या अनुषंगाने उमेदवारांना अनुकंपा तत्वावर नोकरीसाठी अर्ज केलेल्या पत्यावर कागदपत्राच्या पडताळणीसाठी पत्रव्यवहार रजिस्टर पोस्टाने केलेला आहे.

तरी उमेदवारांनी दिलेल्या पत्यावरून पत्र प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव यांचे वतीने करण्यात येत आहे.

(तुकाराम भालके)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद धाराशिव